Literacy for a Billion

Movie: Sangate Aika
Year: 1959

Song: Zali Bhali Pahat
Lyricist: Ga. Di. Madgulkar

दिली कोंबड्यानं बांग
विझे चांदण्यांची रांग
येई जाग पाखरांना
तू ऐक किलबिलाट
झाली भली पहाट
झाली भली पहाट
हे ऊठ रान राजा
झाली भली पहाट
झाली भली पहाट

हां...
मुक्या लेकराची माय
हंबरती माझी गाय
घे ओढ वासरू ते
घे ओढ वासरू ते
रूतली गळ्यात गाठ
झाली भली पहाट
झाली भली पहाट
हे ऊठ रानराजा
झाली भली पहाट
झाली भली पहाट

उरे लेकराची आस
झरे माऊलीची कास
त्या झेलताच धारा
त्या झेलताच धारा
आला भरून माठ
झाली भली पहाट
झाली भली पहाट
हे ऊठ रान राजा
झाली भली पहाट
झाली भली पहाट

लागे दुडूदुडू करू
खुळे शेळीचे कोकरू
येताच माय चाटू
येताच माय चाटू
ते थांबले मुकाट
झाली भली पहाट
झाली भली पहाट
हे ऊठ रान राजा
झाली भली पहाट
झाली भली पहाट

अंगे झिंजाडून सैल
उभे ठाकले रे बैल
गवतात झोपलेली
गवतात झोपलेली
न्हाली दवात वाट
झाली भली पहाट
झाली भली पहाट
हे ऊठ रान राजा
झाली भली पहाट
झाली भली पहाट

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*